दि.दावा क. ७३/१४
संजय वि आदेश
नि.क्र. ४२

**वादीचे साक्षदार क. १ चा सर तपास ॲड. श्री ए. बी. पोंगडे यांचेमार्फत :-**

आता मला माझे सर तपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविले. ते माझया सांगण्याप्रमाणे लिहीलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

**मी खालीलप्रमाणे दस्तऐवज दाखल केलेले आहे :-**

१. दावा मिळकतीचे एकुण **४ ७/१२ उतारे** दाखल केलेले आहेत. ते नि. क. **४३ ते ४६** वर आहेत.

२. त्याचप्रमाणे मिळकतीचे दोन ८अ चे उतारे दाखल केले आहेत ते नि.क्र. **४७ व ४८** वर आहेत.

३. या कामी फेरफार नोंद क. ९७ दि २५.५.२००९ दाखल केली आहे. ती निक्र.. ४९ वर आहे.

४. प्रतिवादींना वकीलांमार्फत दि. २५.९.१४ नोटीस पाठवली. या नोटीसीमधील मजकुर खराव बरोबर आहे. यावर आमचे वकील पोंगडे यांची सही आहे. **नोटीसची स्थळप्रत नि.क. ५०.**

५. प्रतिवादींना रजिस्टर्ड पत्राने **नोटीस** पाठवली. प्रतिवादी निलेश, आदेश व प्रभुलता यांनी नोटीस स्विाकरला नाही त्याचे पाकीट परत आले आहे ते नि.**क. ५१ ते ५३ ,**

६. प्रतिवादी क. ४ धर्मशिला हिने **नोटीस स्विकारली.** त्याची पोचपावती परत आली आहे. त्यावर प्रतिवादीची सही आहे. ती **नि.क्र. ५४.**

७. पटवारी यांनी अदा केलेलो दावा मिळकतीचा **नकाशा** दाखल केला आहे. तो **नि.क्र. ५५.**

**<u>प्रतिवादी क्र. १ ते ४ करीता उलट तपास ॲड. श्री महाले यांचे मार्फत :-</u>**

हे म्हणणे खरे नाही की,माझे वडिलांचे नाव महादेव गायकवाड असे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की,आईचे नाव देवकाबाई असे आहे. हे म्हणणे बरोबर होईल की,वादपत्रामध्ये परिच्छेद २ मध्ये वडिलांचे नावे महादेव गायकवाड असे नमुद केले आहे ते चुकीचे आहे. माझे म्हणण्याप्रमाणे माझे वडिलांचे नाव महादेव लोखंडे आहे. वडील माझे लहानपणीच मयत झाले. हे म्हणणे बरोबर आहे. दावा मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की,वडिलांच्या मृत्युपश्चात मी, माझा भाउ, दोन बहीणी व आई यांची नावे शेतीचे ७/१२ सदरी वारस म्हणुन दाखल झालीत. हे म्हणणे खरे आहे की,वडिलांचे मृत्युसमयी केवळ एक गट नंबर १२, आराजी ४.८६ हेक्टर अशी मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की,वडिलांचे मृत्यपश्चात बहीण रमाबाई व कमलाबाई यांनी दावा मिळकतीमधील आपला हक्क सोडुन दिला. हे म्हणणे खरे नाही की,त्यांनी हक्क सोडल्यापश्चात मी, माझा भाउ व आई यांनी आपसात मिळकतीचे वाटप करुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की,२००९ मध्ये मिळकतीची वाटणी झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की,वाटणीनुसार प्रतिवादी मयत मधुकर याचे हिस्यात ३.२४ हेक्टर व मी आणि आई यांचे संयुक्तिक हिस्यास १.६२ हेक्टर अशी मिळकत आली. हे म्हणणे खरे नाही की,याप्रमाणे वाटणीस अनुसरुन गट क्र. १२/१ व १२/२ अश्या दोन विभागण्या झाल्या. हे म्हणणे खरे आहे की,वाटणीपत्राप्रमाणे दावा मिळकत गट क्र. १२/२, क्षेत्र १.६२ हेक्टर ही आज मितीस माझे कब्ज्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की,गट नंबर १२/१ क्षेत्र ३.२४ हेक्टर ही प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे कब्ज्यात आहे. आता मी सांगते की,पुर्ण १२ एकर जमीन

ही एकत्रात आहे. हे म्हणणे खरे नाही की,मयत मधुकर याचे नावे ३.२४ हेक्टर एवढे क्षेत्र लागले होते व त्याचे पश्चात प्रतिवादी १ ते ४ यांचे नावे दाखल आहे. आता मला ७/१२ नि ४३ दाखवला. हे म्हणणे बरोबर आहे की, यावर केवळ प्रतिवादी १ ते ४ यांची नावे आहेत.

माझी आई सन २००५ मध्ये मयत झाली. हे म्हणणे खरे नाही की,आईचे मृत्युसमयी दावा मिळकत १२/१ चे ७/१२ वर केवळ माझे व माझे आईचे नाव होते. हे म्हणणे खरे नाही की,आईचे मृत्युपश्चात वादी क्र. १ ते ४ यांची नावे दाखल झाली. हे म्हणणे खरे आहे की,मयत शांती सुखदेव कांबळे, कौशल्या लक्ष्मण कांबळे व सुभद्रा कांबळे या माझया आत्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की,वडील हयात असतांना या तिन्ही बहिणींनी दावा मिळकतीमधील आपला हक्क सोडुन दिला. हे म्हणणे खरे आहे की,मात्र ७/१२ सदरी त्यांची नावे कमी झाली नाही. त्यांचा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क बाकी राहीला नाही.

हे म्हणणे खरे आहे की,शेती खेरीज आमचे अन्य वडिलोपार्जित घरही आहे. हे म्हणणे खरे आहे की,या दाव्यात सदर्हु घर मिळकतीचा समावेश केला नाही. आम्हांला घर मिळकतीमध्ये हिस्सा नको आहे. हे म्हणणे खरे नाही की,दावा मिळकतीचे यापुर्वीच मी, आई व मयत मधुकर यांच्यात वाटप झाल्याने दावा दाखल करण्याचा मला अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की,वाटणीपत्रास अनुसरुन फेरफार नोंद झाली आहे व ७/१२ स्वतंत्र झाले आहेत हे मला माहित होते. मला महसुल दरबारी झालेल्या नोंदी संबंधाने सन २०१४ मध्ये प्रथम समजले आहे. हे म्हणणे खरे आहे की,आजतागायत महसुल अधिकारी यांचेकडे मी झालेल्या नोंदीला आक्षेप घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की,दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी १/४ हिस्सा नाही. हे म्हणणे खरे नाही की,दावा मिळकतीपैकी

हिस्सा यापुर्वीच मिळाला आहे, प्रतिवादीविरुद्ध खोटा दावा आणला व खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास प्रतिवादी क. ५ ते ११ करीता तहकुब.**

वा.दा.ब.अ.क.केले.
समक्ष,

(एस.व्ही. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
उमरेड.
दि.१७.७.१७